12 MAY 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरुणांनी आत्मविश्वास बाळगल्यास संधी

## यशवंत थोरात : स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वातील स्पर्धांचे बक्षीस वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'आत्मविश्वास बाळगून इंग्रजीची भीती दूर केल्यास तरुणांना सर्व क्षेत्रात करिअरच्या चांगल्या संधी खुणावत आहेत. प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर आहेत. आजच्या सर्व स्पर्धा आणि त्यातील विजेत्यांमध्ये मुलींचे प्रमाण अधिक असून, ते गौरवास्पद आहे,' असे प्रतिपादन नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात यांनी बुधवारी येथे केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वांतर्गत जिल्हा प्रशासनातर्फे विज्ञान प्रदर्शन, वक्तृत्व, प्रश्नमंजूषा, कथाकथन जिल्हास्तरीय स्पर्धा घेण्यात आल्या. श्री छत्रपती शाहू मिल येथील या स्पर्धांच्या बक्षीस वितरणावेळी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, आरबीआयच्या माजी डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात, क्रिडाई कोल्हापूरचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर प्रमुख उपस्थित होते. जिल्हाधिकारी रेखावार म्हणाले, 'या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी जाणून घेतलेले राजर्षी शाहू महाराज यांचे विचार त्यांना जीवनभर दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरतील.' उषा थोरात म्हणाल्या, 'कृतज्ञता पर्वाच्या निमित्ताने राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचे आणि विचारांचे स्मरण होत आहे. असे उपक्रम दरवर्षी आयोजित करावेत.' 'दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठात ब्रेल लिपीतील विज्ञान प्रयोगशाळा सुरू करण्यासाठी प्रयत्न करू,' असे कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के यांनी सांगितले. या कार्यक्रमात लेखक सतीश नवले यांच्या 'दिव्यांग जनव्यक्तींचे अधिकार अधिनियम २०१६' ब्रेल लिपीतील पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.




कोल्हापुरात बुधवारी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दीनिमित्त जिल्हा प्रशासनातर्फे आयोजित विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण कार्यक्रम शाहू मिल येथे झाला. त्यामध्ये 'दिव्यांग जन व्यक्तींचे अधिकार' या पुस्तिकेचे प्रकाशन नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून एकनाथ आंबोकर, उषा थोरात, सतीश नवले, राहुल रेखावार, विद्यानंद बेडेकर आदी उपस्थित होते.

### विविध स्पर्धांमधील विजेते

कथाकथन स्पर्धा- अनुष्का जाधव (किसनराव मोरे हायस्कूल सरवडे), वैष्णवी कोकरे (इचलकरंजी हायस्कूल), विभा शिंदे (जागृती हायस्कूल गडहिंग्लज). वक्तृत्व स्पर्धा- प्रज्ञा माळकर (श्री पद्माराजे विद्यालय शिरोळ), चैतन्य कांबळे (आर. व्ही. देसाई हायस्कूल मिणचे खुर्द), प्रगती गुरव (जागृती हायस्कूल गडहिंग्लज). प्रश्नमंजूषा स्पर्धा- राधानगरी विद्यालय, वडगाव विद्यालय व ज्युनिअर कॉलेज पेठवडगाव, आ. ब. सरनोबत हायस्कूल, आसुर्ले- पोर्ले. जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन- सानिका पाटील, सई जाधव (बाळासाहेब पाटील- कौलवकर हायस्कूल), समरजीत पवार (कौतुक बालविद्यालय, शिरोली), रिषिता माणकापुरे, सेजल मदवाने (जनतारा कल्पवृक्ष विद्यामंदिर, जयसिंगपूर), अस्लम पठाण, सईद मुल्ला (नॅशनल हायस्कूल, इचलकरंजी), शैलेश शेळके, दिगंबर पायल विपुल (डॉ. मालती मोहन देशी हायस्कूल, वळीवडे).

लोकमत

साहित्य संमेलन : आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलन, स्थळ : विवेकानंद महाविद्यालय, ताराबाई पार्क, वेळ : सकाळी ९.३० वाजता.

ग्रंथ कृतज्ञता समारंभ : शिवाजी विद्यापीठाच्यावतीने ग्रंथ कृतज्ञता समारंभ, स्थळ : शिवाजी विद्यापीठ, वेळ : सकाळी ११ वाजता.

परिचारिका दिन : महाराष्ट्र गव्हर्न्मेंट नर्सेस असोसिएशनच्या वतीने जागतिक परिचारिका दिन, स्थळ : शाहू स्मारक भवन, दसरा चौक, वेळ : दुपारी ३ वाजता.

लोकमत

# विद्यापीठातील प्रवेश अर्ज भरण्यास ३१ मेपर्यंत मुदतवाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात प्रवेश प्रक्रिया सुरू असून, एम.एस्सी.सह अन्य अभ्यासक्रमांचे प्रवेश अर्ज भरण्याची मुदत ३१ मेपर्यंत वाढविली आहे. यात विद्यापीठ अधिविभागातील बी.जे., एम.जे., बी. लिब., एम.ए. इन मास कम्युनिकेशन, एम.ए. इन रशियन, एम.टेक. (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट), एमबीए (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट) एमएसडब्लू (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट), एमबीए (डिस्टन्स मोड), एम.ए. एम.कॉम. एलएल.एम. एम.लिब., एम.आर.एस. (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट), बी.एस्सी.-एम.एस्सी. नॅनो सायन्स आणि अधिविभागातील विविध डिप्लोमा, पीजी डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्सचा समावेश आहे. विद्यार्थ्यांनी (http://www.unishivaji.ac.in/mscadmission/ Admission-२०२२-२०२३) यावरून अर्ज भरावेत. प्रवेश परीक्षा जूनच्या दुसऱ्या आठवड्यात आहेत, अशी माहिती डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

12 MAY 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आत्मविश्वास बाळगल्यास सर्व क्षेत्रांत संधी

## नाबार्डचे माजी अध्यक्ष यशवंत थोरात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आत्मविश्वासाने इंग्रजीची भीती दूर केल्यास तरुणांना सर्व क्षेत्रांत चांगल्या संधी खुणावत आहेत. यात मुलींचा टक्का वाढता आहे, ही गौरवास्पद बाब आहे, असे प्रतिपादन नाबार्डचे माजी अध्यक्ष यशवंत थोरात यांनी केले.




राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्व उपक्रमांतर्गत विज्ञान प्रदर्शन, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा, कथाकथन जिल्हास्तरीय स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी क्रिडाईचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर उपस्थित होते. यावेळी 'दिव्यांग जनव्यक्तींचे अधिकार अधिनियम-२०१६' या सतीश नवले लिखित पुस्तिकेचे प्रकाशन झाले.

स्त्रीशक्ती अगाध असून प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर आहेत. आजच्या सर्व स्पर्धांमध्ये व विजेत्यांमध्ये मुलींचे प्रमाण अधिक आहे, असे सांगून थोरात म्हणाले, विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजीची भीती दूर करण्यासाठी पुढील वर्षी या स्पर्धा इंग्रजी भाषेतूनही घ्याव्यात.

**ब्रेल लिपीतील विज्ञान प्रयोगशाळा सुरू करणार : कुलगुरू**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विविध क्षेत्रांच्या प्रगतीसाठी राजर्षी शाहू महाराजांनी मोलाचे कार्य केले. दिव्यांग (अंध) विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठात ब्रेल लिपीतील विज्ञान प्रयोगशाळा सुरू करण्यासाठी प्रयत्न करू.

जिल्हाधिकारी राहुल रेखावार म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांचे विचार विद्यार्थ्यांना जीवनभर दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरतील. आयुष्याच्या परीक्षेत यशस्वी होण्यासाठी खडतर परिश्रम करा आणि यशस्वी व्हा. डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात म्हणाल्या, कृतज्ञता पर्वाच्या निमित्ताने राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचे आणि विचारांचे स्मरण होत असून असे उपक्रम दरवर्षी आयोजित करावेत. प्रास्ताविक माध्यमिक शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर यांनी केले, तर आभार स्पर्धा समन्वयक प्रा.डॉ.कविता गगराणी यांनी मानले.

12 MAY 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आत्मविश्वास बाळगल्यास तरुणांना अधिक चांगल्या संधी : थोरात

## विज्ञान प्रदर्शन, वक्तृत्व, प्रश्नमंजूषा, कथाकथन जिल्हास्तरीय स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आत्मविश्वास बाळगून इंग्रजीची भीती दूर केल्यास राज्यातील तरुणांना सर्व क्षेत्रात चांगल्या संधी खुणावत आहेत. यात मुलींचा टक्का वाढता आहे, ही गौरवास्पद बाब आहे, असे प्रतिपादन नाबार्डचे माजी अध्यक्ष यशवंत थोरात यांनी केले.

पालकमंत्री सतेज पाटील यांच्या संकल्पनेतून राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्व सुरू आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने सुरू असलेल्या या उपक्रमांतर्गत विज्ञान प्रदर्शन, वक्तृत्व, प्रश्नमंजूषा, कथाकथन



कोल्हापूर : विज्ञान प्रदर्शनात सहभागी विद्यार्थी.

जिल्हास्तरीय स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ बुधवारी शाहू मिल येथे पार पडला, यावेळी प्रमुख अतिथी म्हणून थोरात बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, आरबीआयच्या डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात, क्रेडाईचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर, लेखक सतीश नवले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी 'दिव्यांग जनव्यक्तींचे अधिकार अधिनियम -२०१६' या सतीश नवले यांनी ब्रेल लिपीत लिहिलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच विज्ञान प्रदर्शन, वक्तृत्व, प्रश्नमंजूषा, कथाकथन स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थी-विद्यार्थिनी व शाळांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

**स्पर्धांमधील अनुक्रमे विजेते**

**कथाकथन स्पर्धा :** अनुष्का रवींद्र जावध, (किसनराव मोरे हायस्कूल, सरवडे, ता. राधानगरी), वैष्णवी नितीन कोकरे (इचलकरंजी हायस्कूल, ता. हातकणंगले), विभा कृष्णराज शिंदे (जागृती हायस्कूल, गडहिंग्लज).

**वक्तृत्व स्पर्धा :** प्रज्ञा श्रीकांत माळकर (श्री पद्मराजे विद्यालय, शिरोळ), चैतन्य कुंडलिक कांबळे (आर. व्ही. देसाई. हायस्कूल, मिणचे खुर्द, ता. भुदरगड), प्रगती बाळासाहेब गुरव (जागृती हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, गडहिंग्लज).

**प्रश्नमंजूषा स्पर्धा :** राधानगरी विद्यालय, राधानगरी, ता. राधानगरी, वडगाव विद्यालय व ज्युनिअर कॉलेज पेठवडगाव, ता. हातकणंगले, आ. ब. सरनोबत हायस्कूल, आसुर्ले-पोर्ले, ता. पन्हाळा.

**जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन :** सानिका शिवाजी पाटील व सई सुहास जाधव, बाळासाहेब पाटील-कौलवकर हायस्कूल, कौलव : शेतीविषयक मळणी यंत्र., समरजित विश्वास पवार-कौतुक विद्यालय, शिरोली : अपघात सूचक गॉगल, रिषिता अभिषेक माणकापुरे व सेजल संदीप मदवाने-जनतारा कल्पवृक्ष विद्यामंदिर जयसिंगपूर : शाहू ॲग्रो टूरिझम, उत्तेजनार्थ : अस्लम सलीम पठाण व सईद मोहसीन मुल्ला-नॅशनल हायस्कूल इचलकरंजी : वाहतूक नियंत्रण, शैलेश विलास शेळके व दिगंबर पायल विपुल, डॉ. क. मालती मोहन देशी हायस्कूल, वळिवडे : सौरऊर्जा व आधुनिक शेती.

पुण्यनगरी

# विद्यापीठात ग्रंथ कृतज्ञता समारंभाचे आयोजन

**कोल्हापूर :** बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र आणि मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. १२ मे रोजी बॅ. खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रामध्ये सकाळी ११ वाजता कृतज्ञता समारंभ आयोजित करण्यात आला आहे. मराठीतील ज्येष्ठ कवी सतीश काळसेकर व समीक्षक डॉ. म. सु. पाटील यांच्या कुटुंबीयांनी त्यांचा अनमोल आणि बहुविध असा ग्रंथसंग्रह शिवाजी विद्यापीठास भेट दिला आहे. त्याबद्दल ग्रंथ कृतज्ञता समारंभ आयोजित केला आहे. समारंभासाठी ज्येष्ठ कवी डॉ. चंद्रकांत पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रा. चंद्रकांत पाटील यांचे 'पुस्तकांच्या जगात' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत.

12 MAY 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इंग्रजीची भीती दूर केल्यास नोकरीच्या संधी

## यशवंतराव थोरात ; लोकराजा शाहू स्मृतिशताब्दी महोत्सवात व्याख्यान



थोरात

कोल्हापूर, ता. ११ : ''नव्या पिढीतील आत्मविश्वास वाढविण्याबरोबरच इंग्रजीची भीती दूर केल्यास तरुणांची शिक्षणातील अशा तरुणांना नोकरीच्या संधी खुणावत आहेत.'' असे मत नार्बाडचे माजी अध्यक्ष यशवंत थोरता यांनी आज येथे व्यक्त केले. राजर्षी शाहू महाराज स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त आयोजित नोकरीच्या संधी या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. उपक्रमाच्या बक्षीस वितरणप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

श्री थोरात म्हणाले, ''बहुतेक क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर आहेत. उल्लेखनीय यश मिळविणाऱ्यांत मुलींची संख्या जास्त आहे. नव्या पिढीत मराठी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजी विषयाची भीती दूर करण्यासाठी पुढील वर्षी या स्पर्धा इंग्रजीमधून घ्याव्यात.''

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, ''राजर्षी शाहू महाराजांना शेती, कला, क्रीडा, सांस्कृतिक, शिक्षण अशा क्षेत्राच्या प्रगतीसाठी मोलाचे कार्य केले.'' जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनीही राजर्षी शाहूंच्या कार्याचा आढावा घेतला.

विजेते : (अनुक्रमे) : कथाकथन : अनुष्का रवींद्र जाधव, वैष्णवी नितीन कोकरे, विभा कृष्णराज शिंदे. वक्तृत्व स्पर्धा : प्रज्ञा श्रीकांत माळकर, चैतन्य कुंडीलक कांबळे, प्रगती बाळासाहेब गुरव. जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन : सानिका व सई जाधव बाळासाहेव पाटील कौलवकर हायस्कूल कौलव (शेती मळणी यंत्र), समरजीत पोवार कौतुक विद्यालय शिरोली (अपघात सूचक यंत्र) रिषिता अभिषेक माणकापुरे व सेजल संदीप मदवाने जनतारा विद्यामंदिर जयसिंगपूर (शाहू ॲग्रो टुरिझम)

तरुण भारत

# शाहू स्मृतिशताब्दी जिल्हास्तरीय कथाकथन स्पर्धेत अनुष्का जाधव प्रथम

प्रतिनिधी
सरवडे

छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त शाहू मिल येथे आयोजित जिल्हास्तरीय कथाकथन स्पर्धेत सरवडे (ता. राधानगरी) येथील किसनराव मोरे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थीनी अनुष्का रविंद्र जाधव (इयत्ता ६ वी) हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला. तिला



५ हजार रुपये व प्रमाणपत्र देऊन जिल्हाधिकारी राहुल रेखावर, कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते गौरविण्यात आले. स्पर्धेसाठी प्रा. अतुल कुंभार यांनी विशेष मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष विजयसिंह मोरे, प्राचार्य पी. एस. पाटील, उपप्राचार्य ए. बी. सावंत, पर्यवेक्षक डी. एम टिपूगडे यांचे प्रोत्साहन तर प्रा. टी. ए. मगदूम, एम. के. गोडसे, एच. डी. पाटील यांचे प्रोत्साहन लाभले.

तरुण भारत

# विधी अभ्यासक्रमानंतर नोकरीच्या संधी

कोल्हापूर :विधी अभ्यासक्रम अतिशय अवघड असला तरी या क्षेत्राकडे विद्यार्थ्यांचा कल आहे. विद्यार्थीदशेपासूनच संपूर्ण कायद्याचा अभ्यास व्यवस्थित केला तर या क्षेत्रात नोकरीच्या संधी अनेक आहेत, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती टी. व्ही. नलावडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभागामार्फत आयोजित पाच दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. 'ज्युडिशियल एक्झामिनेशन प्रिपरेशन अँड फंडामेंटल्स ऑफ कोर्ट प्रॅक्टीस" यावर कार्यशाळा होत आहे. निवृत्त न्यायमूर्ती नलावडे यांनी विधी अधिविभागातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. नवोदित वकिलांची कर्तव्ये, न्यायालयीन अधिकारांचे स्वातंत्र्य, विधी शिक्षणानंतरच्या संधी यावर मार्गदर्शन केले. यावेळी अॅड. सूर्यकांत मिरजे यांनी भारतीय साक्षी-पुरावा अधिनियम यावर मार्गदर्शन केले. विधी अधिविभागप्रमुख डॉ. व्ही. वाय. धुपदाळे यांनी प्रास्ताविक केले. अॅड. आदिती वडेर यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. माधवी माळगे यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी उपस्थित होते.